# समाज घडविणारे विद्यार्थी हवेत

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



डॉ. पी. पी. पाटील

‘सध्या उच्च शिक्षण क्षेत्रासमोर अनेक आर्थिक तसेच प्रतिकूल आव्हाने उभी राहत आहेत. या परिस्थितीत जागतिक स्पर्धेत आपला विद्यार्थी कसा टिकेल, याचा विचार करण्याची वेळ प्रादेशिक विद्यापीठांवर आली आहे. केवळ पदवीधर घडविण्यापेक्षा समाजाचा नागरिक म्हणून काळानुरूप परिवर्तनशील गोष्टींच्या आधारे समाज घडवणारे विद्यार्थी समाजाची गरज आहे’ असे प्रतिपादन जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील यांनी रविवारी येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या ५६व्या वर्धापनदिन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते, तर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, ‘उच्चशिक्षणाच्या क्षेत्रात अनेक बदल गतीने होत आहेत. या नव्या बदलांना सामोरे जाण्यास विद्यापीठांनी सज्ज झाले पाहिजे. निश्चित रोजगाराची हमी देणारे शिक्षण देण्याची जबाबदारी विद्यापीठांनी स्वीकारण्याची गरज आज निर्माण झाली आहे. यापुढील काळात समाज विद्यापीठांकडे येणार नाही, तर विद्यापीठांनीच आता समाजाकडे जाण्याची गरज आहे. त्या अनुषंगाने त्यांनी स्वतःच्या कार्यप्रणालीत आणि धोरणांमध्ये बदल केले पाहिजेत.’




शिवाजी विद्यापीठाच्या ५६व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित समारंभात विविध पारितोषिक विजेत्यांसमवेत प्रमुख पाहुणे तथा जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.पी. पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.

**कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील यांचे प्रतिपादन**

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी विद्यापीठाच्या विविध योजनांची माहिती दिली. विद्यापीठ, महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांची गुणवंत पाल्यांचा पारितोषिके देऊन गौरव झाला. प्रशासकीय गुणवत्ता अभियानांतर्गत पुरस्कार प्राप्त प्रशासकीय विभाग व अधिविभागांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले. वर्षभरात ‘नॅक’चे ‘अ+’ व ‘अ’ मानांकन मिळविणाऱ्या संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक केले. संगीत अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत व पसायदान सादर केले. नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

तत्पूर्वी, विद्यापीठ प्रांगणात प्रमुख पाहुणे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील यांच्या हस्ते शिवपुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. परिसरातून विशेष रॅली काढण्यात आली. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. भारती पाटील, इनक्युबेशन व इनोव्हेशन सेंटरचे संचालक डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत आदी उपस्थित होते.

### पारितोषिक विजेते

विद्यापीठातील गुणवंत शिक्षक : प्रा. डॉ. भारती पाटील (राज्यशास्त्र अधिविभाग), प्रा. डॉ. आर. के. कामत (इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग).
विद्यापीठातील गुणवंत सेवक : टी. एस. भुतकर (सहाय्यक कुलसचिव), नामदेव चरापले (वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक, रसायन), भास्कर सांगावकर (वरिष्ठ लघुलेखक), सदानंद माने (वरिष्ठ लघुलेखक), मारुती मगदूम (हवालदार).
महाविद्यालयीन गुणवंत सेवक : डॉ. अरुणकुमार सकटे (प्रबंधक, छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा).

# बदलांना सामोरे जाण्यास सज्ज व्हा

## कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील : शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा वर्धापनदिन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

उच्चशिक्षणाच्या क्षेत्रात वेगाने बदल होत आहेत. रोज नवे तंत्रज्ञान समोर येत आहे. अशा वेगवान काळात या नव्या बदलांना सामोरे जाण्यासाठी विद्यापीठांनी सज्ज व्हावे, असे प्रतिपादन जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील यांनी रविवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या वर्धापनदिन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते, तर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठात सेंटर फॉर व्हीएलएसआय डिझाईन आणि सेंटर फॉर नॅनो-फॅब्रिक्स ही दोन केंद्रे उभारण्यात येणार आहेत. सेंटर फॉर नॅनो फॅब्रिक्समध्ये नॅनो तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आधुनिक कापड निर्मितीच्या अनुषंगाने संशोधन करण्यात येणार आहे. भविष्यातील कपडे हे याच तंत्रज्ञानाच्या आधाराने निर्माण होणारे असतील. सेंटर फॉर व्हीएलएसआय डिझाईन हे केंद्र आपल्या राष्ट्रीय योगदानाचे प्रतीक ठरणार आहे. भारताने स्वत: विकसित केलेली आय. आर.एन.एस.एस. ही उपग्रह मालिका अवकाशात यशस्वीरीत्या प्रक्षेपित केली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश केंद्रामध्येही या उपग्रह मालिकेचा एक रीसिव्हर बसविण्यात आला आहे आणि तो अत्यंत प्रभावीपणे कार्यरत आहे. हा रीसिव्हर बसविण्यात आलेले शिवाजी विद्यापीठ हे देशातील एकमेव विद्यापीठ आहे.




**कोल्हापूर : विद्यापीठाच्या वर्धापन दिन कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील. व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. विलास नांदवडेकर आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

### विशेष मल्टिमीडिया संग्रहाचे उद्घाटन

*शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांवरील विविध स्वरूपातील उपलब्ध ऑनलाईन स्रोतांचे एकत्रित संकलन करून त्याचे विशेष वेब-पेज विद्यापीठाच्या वेबसाईटवर निर्माण करण्यात आले आहे. यामध्ये महाराजांवरील १४२ ई-बुक्स व ऑडिओ बुक्स, विकिपीडियावरील लिंक्स, चित्रपट आणि पीएच. डी. शोधप्रबंध या सामग्रीचा समावेश आहे. याचे उद्घाटन करण्यात आले.*

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक केले व प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. संगीत अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत व पसायदान सादर केले. नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

**विविध पारितोषिक विजेते**

विद्यापीठातील गुणवंत शिक्षक : प्रा. डॉ. भारती पाटील (राज्यशास्त्र अधिविभाग), प्रा. डॉ. आर. के. कामत (इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग). विद्यापीठातील गुणवंत सेवक : टी. एस. भुतकर (सहायक कुलसचिव), नामदेव चरापले (वरिष्ठ तांत्रिक सहायक (रसायन), भास्कर सांगावकर (वरिष्ठ लघुलेखक), सदानंद माने (वरिष्ठ लघुलेखक), मारुती मगदूम (हवालदार). महाविद्यालयीन गुणवंत सेवक : डॉ. अरुणकुमार सकटे (प्रबंधक, छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा) आदींना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

लोकमत

## पी. पी. पाटील : शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या वर्धापनदिनानिमित्त गुणवंतांचा पुरस्काराने सन्मान

# विद्यापीठांनी रोजगाराची हमी देणारे शिक्षण द्यावे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** केवळ पदवीधर निर्माण करण्यापेक्षा निश्चित रोजगाराची हमी देणारे शिक्षण देण्याची जबाबदारी विद्यापीठांनी घ्यावी. संशोधन हा विद्यापीठाचा मूलभूत पाया आहे. जागतिक दर्जाचे संशोधन होण्यासाठी प्रशासकीय सोपस्कारांच्या पलीकडे जाऊन त्याला चालना देण्याची गरज आहे. कल्पकता, कठोर परिश्रम यांच्या बळावर नवसंशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. पी. पी. पाटील यांनी कोल्हापूर येथे रविवारी केले.



नसीर अत्तार

**कोल्हापुरात रविवारी शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. पी. पी. पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण झाले. यावेळी सदानंद माने, तेजस्विनी भूतकर, भारती पाटील, आर. के. कामत, डी. टी. शिर्के, विलास नांदवडेकर, अरुणकुमार सकटे, नामदेव चरापले, मारुती मगदूम, भास्कर सांगावकर उपस्थित होते.**

शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते.

कुलगुरु डॉ. पाटील म्हणाले, उच्च शिक्षणामध्ये गतीने बदल होत आहेत. अनेक प्रकारची प्रतिकूल आव्हाने प्रादेशिक विद्यापीठांसमोर आहेत. जागतिक स्पर्धेत आपले विद्यार्थी कसे टिकतील, याचा विचार विद्यापीठांनी करणे आवश्यक आहे. विद्यापीठाने आता समाजाकडे जावे. त्या दृष्टीने पारंपरिक शिक्षणपद्धती, धोरणात्मक बदल करावेत. नव्या बदलांना सामोरे जाण्यास सज्ज व्हावे. या कार्यक्रमात प्रमुख उपस्थितांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. त्यामध्ये राज्यशास्त्र अधिविभागाच्या प्रा. डॉ. भारती पाटील, इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे प्रा. डॉ. आर. के. कामत यांना 'विद्यापीठातील गुणवंत शिक्षक', सहायक कुलसचिव तेजस्विनी भूतकर, वरिष्ठ तांत्रिक सहायक नामदेव चरापले, वरिष्ठ लघुलेखक भास्कर सांगावकर, सदानंद माने, हवालदार मारुती मगदूम यांना 'विद्यापीठातील गुणवंत सेवक' आणि साताऱ्यातील छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्रबंधक डॉ. अरुणकुमार सकटे यांना 'महाविद्यालयीन गुणवंत सेवक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्मृतिचिन्ह, ग्रंथ, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप होते. शिक्षक, प्रशासकीय सेवकांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला. प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक केले. नंदिनी पाटील, धैर्यशील पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

### राष्ट्रीय योगदानाचे प्रतीक



विद्यापीठात सेंटर फॉर व्हीएलएसआय डिझाईनद्वारे संरक्षण खात्याला 'आयआरएनएसएस'साठी गुंतागुंतीच्या, महत्त्वाच्या चिप्स तयार केल्या जाणार आहेत. हे केंद्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय योगदानाचे प्रतीक ठरेल. सेंटर फॉर नॅनो फॅब्रिक्समध्ये नॅनो तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आधुनिक कापडनिर्मितीबाबत संशोधन होईल. सायबर सिक्युरिटी रिसोर्स सेंटर आणि इन्क्युबेशन व इनोव्हेशन सेंटर विद्यापीठाची वेगळी ओळख ठरणार असल्याचे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले. संबंधित वेब-पेजचे या कार्यक्रमात उद्घाटन झाले.

### शिवाजी महाराज यांच्याबाबतचा विशेष संग्रह

बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबतच्या विविध स्वरुपांतील ऑनलाईन स्रोतांचे एकत्रित संकलन केले आहे. त्याचे विशेष वेब-पेज विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तयार केले आहे. त्यामध्ये १४२ ई-बुक्स, ऑडिओ बुक्स, विकिपीडियावरील लिंक्स, चित्रपट आणि पीएच. डी. शोधप्रबंध आहेत. संबंधित वेब-पेजचे या कार्यक्रमात उद्घाटन झाले.

# बदलांना सामोरे जाण्यास विद्यापीठांनी सज्ज व्हावे

## कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील : शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा वर्धापनदिन उत्साहात

कोल्हापूर / प्रतिनिधी :

उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक बदल गतीने होत आहेत. या नव्या बदलांना सामोरे जाण्यास विद्यापीठांनी सज्ज व्हावे, असे प्रतिपादन जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या वर्धापनदिन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या समारंभात अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, सध्या उच्च शिक्षण क्षेत्रासमोर अनेक आर्थिक तसेच प्रतिकूल आव्हाने उभी राहताहेत. या परिस्थितीत जागतिक स्पर्धेत आपला विद्यार्थी कसा टिकेल, याची चिंता करण्याची वेळ प्रादेशिक विद्यापीठांवर आलेली आहे. त्यामुळे केवळ पदवीधर घडवण्यापेक्षा निश्चित रोजगाराची हमी देणारे शिक्षण देण्याची जबाबदारी विद्यापीठांनी स्वीकारण्याची गरज निर्माण झाली आहे. पारंपरिक शिक्षण पद्धती बदलून आता नवतंत्रज्ञान आणि कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमांचा अंगीकार करण्याची आवश्यकता आहे. संशोधन ही विद्यापीठांची अविभाज्य ओळख



**कोल्हापूर : जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठातील गुणवंत शिक्षक पुरस्कार स्वीकारताना प्रा. डॉ. आर. के. कामत. सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.**

आहे. कल्पकता आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर नवसंशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधा पुरवाव्यात. कोल्हापूरच्या पुरोगामी प्रतिमा निर्मितीमध्ये राजर्षी शाहू महाराजांचे अतुलनीय योगदान असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी आपल्या भाषणात केला.

विद्यापीठातील, महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांचे गुणवंत पाल्य यांचा विद्यापीठ प्रशासकीय तसेच कल्याण निधी पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. तसेच, प्रशासकीय गुणवत्ता अभियानांतर्गत पुरस्कारप्राप्त प्रशासकीय विभाग व अधिविभाग यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले.

**विविध पारितोषिक विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे :** विद्यापीठातील गुणवंत शिक्षक : डॉ. भारती पाटील (राज्यशास्त्र अधिविभाग), डॉ. आर. के. कामत (इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग), विद्यापीठातील गुणवंत सेवक : टी. एस. भुतकर (सहायक कुलसचिव), नामदेव नानासो चरापले (वरिष्ठ तांत्रिक सहायक- रसायन), भास्कर राजाराम सांगावकर (वरिष्ठ लघुलेखक), सदानंद श्रीधर माने (वरिष्ठ लघुलेखक), मारुती नारायण मगदूम (हवालदार), महाविद्यालयीन गुणवंत सेवक : डॉ. अरुणकुमार जयराम सकटे (प्रबंधक, छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा).

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. संगीत अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत व पसायदान सादर केले. नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

तत्पूर्वी विद्यापीठ प्रांगणात प्रमुख पाहुणे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील यांच्या हस्ते शिवपुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. विद्यापीठ परिसरातून विशेष रॅलीचेही आयोजन करण्यात आले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. भारती पाटील, इनक्युबेशन व इनोव्हेशन सेंटरचे संचालक डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांचे कुटुंबीय, विद्यार्थी उपस्थित होते.

## व्हीएलएसआय डिझाईन, नॅनो-फॅब्रिक्स केंद्रे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सेंटर फॉर व्हीएलएसआय डिझाईन आणि सेंटर फॉर नॅनो-फॅब्रिक्स ही दोन केंद्रे उभारण्यात येणार असल्याची घोषणा अध्यक्षीय भाषणात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केली.

ते म्हणाले, सेंटर फॉर नॅनो फॅब्रिक्समध्ये नॅनो तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आधुनिक कापड निर्मितीच्या अनुषंगाने संशोधन करण्यात येणार आहे. भविष्यातील कपडे हे याच तंत्रज्ञानाच्या आधाराने निर्माण होणारे असतील. काळाची पावले ओळखून विद्यापीठात हे केंद्र विकसित होत आहे. सेंटर फॉर व्हीएलएसआय डिझाईन हे केंद्र आपल्या राष्ट्रीय योगदानाचे प्रतीक ठरणार आहे. आजवर साऱ्या जगात केवळ गुगल या अमेरिकी कंपनीची जीपीएस प्रणाली वापरली जात होती. तथापि, भारताने स्वतः विकसित केलेली आयआरएनएसएस ही उपग्रह मालिका अवकाशात यशस्वीरीत्या प्रक्षेपित केली आहे आणि तिच्या साहाय्याने भारत स्वतःची अत्याधुनिक जीपीएस प्रणाली विकसित करतो आहे. शिवाजी विद्यापीठातर्फे पन्हाळा येथील अवकाश केंद्रामध्येही या उपग्रह मालिकेचा एक रिसिव्हर बसवण्यात आला आहे आणि तो अत्यंत प्रभावीपणे कार्यरत आहे. हा रिसिव्हर बसवण्यात आलेले शिवाजी विद्यापीठ हे देशातील एकमेव विद्यापीठ आहे. या नव्या सेंटरच्या माध्यमातून संरक्षण खात्याला या आयआरएनएसएससाठी आवश्यक असणाऱ्या काही अत्यंत गुंतागुंतीच्या आणि महत्त्वाच्या चिप्स बनवण्याचे काम करण्यात येणार आहे.

सध्या ऑनलाइन आर्थिक व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणात सुरू असणारे घोटाळे आणि फसवणुकीचे प्रकार आणि इतर प्रकारची सायबर गुन्हेगारी यांना आळा घालण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची देशाला खूप मोठ्या प्रमाणात गरज आहे. ती गरज पूर्ण करण्याचे काम हे केंद्र करणार आहे. हे मनुष्यबळ आंतरराष्ट्रीय दर्जाचे असावे, यासाठी विद्यापीठ नॅसकॉम या राष्ट्रीय संघटनेच्या साहाय्याने प्रशिक्षण कार्यक्रम राबविणार आहे. त्या दृष्टीने या केंद्रामध्ये येत्या २६ नोव्हेंबरपासून पहिले प्रशिक्षण सुरू होणार असून प्रवेशही पूर्ण भरले आहेत. या केंद्रामार्फत सेफ्टी ऑडिट सेवा, शिक्षक व शासकीय अधिकारी प्रशिक्षण तसेच जागृती कार्यशाळाही घेण्यात येणार आहेत.

विद्यापीठामध्ये संशोधन आकाराला आणण्यासाठी केंद्र सुरू करण्यात आले आहे. यामध्ये कोल्हापुरी चप्पलसारख्या जागतिक ख्यातीच्या उपक्रमाला क्लस्टरच्या माध्यमातून गती व ऊर्जा प्रदान करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. नजीकच्या काळात शिवाजी विद्यापीठाचे हे सर्वात गतिशील केंद्र असणार आहे. समाजातील प्रयोगशील आणि नवनवीन संकल्पना राबवू इच्छिणाऱ्या नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी त्यांच्या कल्पना घेऊन विद्यापीठाकडे यावे. विद्यापीठाचे इनक्युबेशन व इनोव्हेशन सेंटर त्यांना निश्चितपणे सर्वतोपरी सहकार्य करील.

## शिवरायांवरील संग्रहाचे वेब-पेज

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांवरील विविध स्वरूपातील उपलब्ध ऑनलाईन स्रोतांचे एकत्रित संकलन करून त्याचे विशेष वेब-पेज विद्यापीठाच्या वेबसाईटवर निर्माण करण्यात आले आहे. यामध्ये महाराजांवरील १४२ ई-बुक्स व ऑडिओ बुक्स, विकिपीडियावरील लिंक्स, चित्रपट आणि पीएच. डी. शोधप्रबंध या सामग्रीचा समावेश आहे.

19 NOV 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठांनी नवे बदल स्वीकारावेत

## डॉ. पी.पी.पाटील यांचे आवाहन : शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनी कार्यक्रम



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित समारंभात पारितोषिक विजेत्यांसोबत जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

जागतिक स्पर्धेत आपला विद्यार्थी कसा टिकेल, याची चिंता करण्याची वेळ प्रादेशिक विद्यापीठांवर आलेली आहे. त्यामुळे नव्या बदलांना सामोरे जाण्यास विद्यापीठांनी सज्ज व्हावे, असे आवाहन जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या वर्धापनदिनी आयोजित बक्षीस वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, विद्यापीठांनी आता नवतंत्रज्ञान आणि कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम तयार करण्याची गरज आहे. कल्पकता आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर नवसंशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधा पुरवाव्यात. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठांनी ग्रामीणतेचा शिक्का पुसावा.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठात सेंटर फॉर व्हीएलएसआय डिझाईन आणि सेंटर फॉर नॅनो-फॅब्रिक्स ही दोन केंद्रे उभारण्यात येणार आहेत. यावेळी शिवाजी महाराजांवरील विशेष मल्टिमीडिया संग्रहाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यापीठ, महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, पाल्ये यांना पारितोषिके देवून गौरवण्यात आले. तसेच, प्रशासकीय गुणवत्ता अभियानांतर्गत पुरस्कार प्राप्त प्रशासकीय विभाग व अधिविभाग यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी प्रास्ताविक केले. नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, व्ही. टी. पाटील, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. भारती पाटील, डॉ. आर. के. कामत, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. नमिता खोत उपस्थित होते.

### विविध पारितोषिक विजेते

विद्यापीठातील गुणवंत शिक्षक: प्रा.डॉ. भारती पाटील (राज्यशास्त्र अधिविभाग), प्रा.डॉ. आर.के. कामत (इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग). विद्यापीठातील गुणवंत सेवक: श्रीमती टी.एस. भुतकर (सहाय्यक कुलसचिव), नामदेव नानासो चरापले (वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक (रसायन)), भास्कर राजाराम सांगावकर (वरिष्ठ लघुलेखक), सदानंद श्रीधर माने (वरिष्ठ लघुलेखक), मारुती नारायण मगदूम (हवालदार). महाविद्यालयीन गुणवंत सेवक: डॉ. अरुणकुमार जयराम सकटे (प्रबंधक, छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा).

19 NOV 2018

Times of India


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Teachers, administrative staff felicitated at Shivaji University's 56th Foundation Day

Vice chancellor of Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon P P Patil said that universities across the country should prepare for changes in academics with the changing times. He was speaking at the 56th foundation day of Shivaji University, Kolhapur (SUK) that was held recently.

Patil said that simply producing a graduate was not enough and that universities should look for offering education that would guarantee employment to a student.

TOI



SUK authorities carried out a rally on Sunday on the occasion of 56th Foundation Day

**CAMPUS BUZZ**

Teachers from the university and its affiliated colleges, administrative officers excelling in their duties and wards of the teaching and non-teaching staff of the university who have excelled in academics were felicitated at the ceremony.

SUK started functioning in 1962 in Kolhapur to cater to the students of South Maharashtra. The university had started with 34 affiliated colleges, 14,000 students and five post-graduate departments in the campus.

Currently, 293 colleges in the jurisdiction of Sangli, Satara and Kolhapur districts are affiliated with Shivaji University. More than 3 lakh students are enrolled in 10 major faculties such as arts, science, social sciences, commerce, education, fine arts, law, medicine, engineering and technology.

**Workshop at KIT:** Kolhapur Institute of Technology's (KIT) College of Engineering in association with the National Institute of Urban Affairs (NIUA) has organised a workshop on 'Global and national perspective of sustainable sanitation approaches and technology interventions' from November 26 to December 8. According to KIT, its environmental engineering department has signed an MoU with the NIUA under sanitation capacity building platform.

**DKTE in AICTE best practice institutions' list:** Ichalkaranji-based DKTE society's Textile and Engineering Institute has been included in the best practice institutions' list of the All India Council for Technical Education (AICTE). The list has been published on AICTE website.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनात जळगाव येथील उत्तर महाराष्ट्र बहिणाबाई चौधरी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील यांच्या हस्ते विद्यापीठ व महाविद्यालयांतील गुणवंतांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. गुणवंत शिक्षकाचा पुरस्कार स्वीकारताना डावीकडून डॉ. आर. के. कामत व प्रा. डॉ. भारती पाटील, गुणवंत सेवकाचा पुरस्कार स्वीकारताना टी. एस. भूतकर, नामदेव चरापले, भास्कर सांगावकर, सदानंद माने, मारुती मगदूम, डॉ. अरुणकुमार सकटे. शेजारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.

# गुणवंत शिक्षक, सेवकांचा कौतुक सोहळा

## शिवाजी विद्यापीठ वर्धापन दिन; प्रशासकीय विभाग, अधिविभागांनाही पुरस्कार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठ व महाविद्यालयातील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक व त्यांच्या गुणवंत पाल्यांचा विशेष पुरस्काराने आज गौरव झाला. त्यांना विद्यापीठ प्रशासकीय व कल्याण निधी पारितोषिके दिली. वर्षभरात 'नॅक'चे 'अ+'व 'अ' मानांकन मिळविणाऱ्या विद्यापीठ परिक्षेत्रातील संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांसह प्रशासकीय गुणवत्ता अभियानांतर्गत पुरस्कार प्राप्त प्रशासकीय विभाग व अधिविभाग यांनाही पुरस्कार प्रदान केले. विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला.

गुणवंत शिक्षक : प्रा. डॉ. भारती पाटील (राज्यशास्त्र अधिविभाग), प्रा. डॉ. आर. के. कामत (इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग). गुणवंत सेवक : टी. एस. भुतकर (सहायक कुलसचिव), नामदेव नानासो चरापले (वरिष्ठ तांत्रिक सहायक, रसायनशास्त्र अधिविभाग), भास्कर राजाराम सांगावकर (वरिष्ठ लघुलेखक), सदानंद श्रीधर माने (वरिष्ठ लघुलेखक), मारुती नारायण मगदूम (हवालदार). महाविद्यालयीन गुणवंत सेवक : डॉ. अरुणकुमार जयराम सकटे (प्रबंधक, छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा).

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. भारती पाटील, इनक्युबेशन व इनोव्हेशन सेंटरचे संचालक डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत उपस्थित होते. नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

### परिसरातून विशेष फेरी

**विद्यापीठ प्रांगणात जळगावच्या उत्तर महाराष्ट्र बहिणाबाई चौधरी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील यांच्या हस्ते शिवछत्रपतींच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. विद्यापीठ परिसरातून विशेष फेरीही काढली.**

सकाळ

## विलोभनीय ज्ञानपीठ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा परिसर पाहता निळ्या निळ्या आकाशगंगेसमोर विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी आकाश भरारी घ्यावी, असेच वाटते. हिरवाईने नटलेला परिसर, छत्रपती शिवरायांचा आश्वारूढ पुतळ्याचे सौंदर्य, तर अप्रतिमच. वर्धापनदिनी मोबाईलमध्ये कैद केलेले ज्ञानपीठाचे हे सौंदर्य.

(राजू कुलकर्णी : सकाळ छायाचित्रसेवा)

सकाळ

# रोजगाराची हमी देणारे शिक्षण द्यावे

## कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील; शिवाजी विद्यापीठाचा वर्धापन दिन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १८ : 'केवळ पदवीधर घडविण्यापेक्षा निश्चित रोजगाराची हमी देणारे शिक्षण देण्याची जबाबदारी विद्यापीठांनी स्वीकारावी, असे आवाहन जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील यांनी आज येथे केले. उच्च शिक्षण क्षेत्रातील बदलांना सामोरे जाण्यास विद्यापीठांनी सज्ज व्हावे,' असेही त्यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या वर्धापन दिन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला. डॉ. पाटील म्हणाले, ''सध्या उच्च शिक्षण क्षेत्रासमोर प्रतिकूल आव्हाने उभी राहत आहेत. जागतिक स्पर्धेत आपला विद्यार्थी कसा टिकेल, याची चिंता करण्याची वेळ प्रादेशिक विद्यापीठांवर आहे. यापुढील विद्यापीठांनीच समाजाकडे जाण्याची गरज आहे. त्या अनुषंगाने त्यांनी स्वतःच्या कार्यप्रणालीत व धोरणांत बदल करावा. पारंपरिक शिक्षण पद्धती बदलून आता नवतंत्रज्ञान आणि कौशल्याधारित



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त बोलताना कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील. शेजारी डावीकडून प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.



अभ्यासक्रमांचा अंगीकार करणे आवश्यक आहे.'' असे सांगून ते म्हणाले, ''संशोधन ही विद्यापीठांची अविभाज्य ओळख आहे. यापुढील काळात नावीन्यपूर्ण व समाजाभिमुख संशोधनाचे महत्त्व अबाधित राहणार आहे. त्या दृष्टीने प्रशासकीय संशोधनाच्या पलीकडे जाऊन विद्यापीठांनी संशोधनाला चालना द्यावी. कल्पकता व कठोर परिश्रम यांच्या जोरावर नवसंशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधा पुरवाव्यात.''

डॉ. शिंदे म्हणाले, ''शिवाजी विद्यापीठात सेंटर फॉर व्हीएलएसआय डिझाईन आणि सेंटर फॉर नॅनो-फॅब्रिक्स ही दोन केंद्रे उभारण्यात येणार आहेत. सेंटर फॉर नॅनो फॅब्रिक्समध्ये नॅनो तंत्रज्ञानाच्या साह्याने आधुनिक कापडनिर्मितीच्या अनुषंगाने संशोधन करण्यात येणार आहे. भविष्यातील कपडे याच तंत्रज्ञानाच्या आधाराने निर्माण होणारे असतील. काळाची पावले ओळखून विद्यापीठात केंद्र विकसित होत आहे. सेंटरच्या माध्यमातून संरक्षण खात्याला या आयआरएनएसएससाठी आवश्यक असणारे काही अत्यंत गुंतागुंतीच्या आणि महत्त्वाच्या चिप्स बनविण्याचे काम करण्यात येणार आहे.''

विद्यापीठात इनक्युबेशन आणि इनोव्हेशन सेंटरची स्थापनाही करण्यात आली आहे. समाजातील प्रयोगशील आणि नवनवीन संकल्पना राबवू इच्छिणाऱ्या नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी त्यांच्या कल्पना घेऊन विद्यापीठाकडे यावे. विद्यापीठाचे इनक्युबेशन व इनोव्हेशन सेंटर त्यांना निश्चितपणे सर्वतोपरी सहकार्य करील, असे आवाहनही कुलगुरूंनी या प्रसंगी केले.

### विशेष वेब-पेज

**बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांवरील विविध स्वरूपातील उपलब्ध ऑनलाईन स्रोतांचे एकत्रित संकलन करून त्याचे विशेष वेब-पेज विद्यापीठाच्या वेबसाईटवर निर्माण केले आहे. यामध्ये महाराजांवरील १४२ ई-बुक्स व ऑडिओ बुक्स, विकिपीडियावरील लिंक्स, चित्रपट आणि पीएच.डी. शोधप्रबंध या सामग्रीचा समावेश आहे.**

मटा अँकर

शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची घोषणा

# नॅनो फॅब्रिक्स, व्हीएलएसआय डिझाइनचे सेंटर

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'विद्यापीठात सेंटर फॉर व्हीएलएसआय डिझाइन आणि सेंटर फॉर नॅनो-फॅब्रिक्स ही दोन केंद्रे उभारण्यात येणार आहेत' अशी घोषणा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केली. विद्यापीठाच्या ५६व्या वर्धापनदिन समारंभात अध्यक्षीय स्थानावरून बोलताना त्यांनी ही माहिती दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'सेंटर फॉर नॅनो फॅब्रिक्समध्ये नॅनो तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आधुनिक कापड निर्मितीच्या अनुषंगाने संशोधन करण्यात येणार आहे. भविष्यातील कपडे हे याच तंत्रज्ञानाच्या आधाराने निर्माण होणारे असतील. काळाची पावले ओळखून विद्यापीठात हे केंद्र विकसित होते आहे. सेंटर फॉर व्हीएलएसआय डिझाइन हे केंद्र आपल्या राष्ट्रीय योगदानाचे प्रतीक ठरणार आहे. आजवर साऱ्या जगात केवळ गुगल या अमेरिकी कंपनीची जीपीएस प्रणाली वापरली जात होती. तथापि, भारताने स्वतः विकसित केलेली आयआरएनएसएस ही उपग्रह मालिका अवकाशात यशस्वीरित्या प्रक्षेपित केली आहे आणि त्याच्या सहाय्याने भारत स्वतःची अत्याधुनिक जीपीएस प्रणाली विकसित करतो आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अवकाश केंद्रामध्येही या उपग्रह मालिकेचा एक रिसिव्हर बसविण्यात आला आहे आणि तो अत्यंत प्रभावीपणे कार्यरत आहे. हा रिसिव्हर बसविण्यात आलेले शिवाजी विद्यापीठ हे देशातील एकमेव आहे. नव्या सेंटरच्या माध्यमातून संरक्षण खात्याला आयआरएनएसएससाठी आवश्यक काही अत्यंत गुंतागुंतीच्या आणि महत्त्वाच्या चिप्स बनविण्याचे काम करण्यात येणार आहे. अशा प्रकारे राष्ट्रीय प्रकल्पामध्ये योगदान देण्यासाठी विद्यापीठ सज्ज झाले आहे.'

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'आयआयटीसह देशातील अनेक आघाडीच्या शैक्षणिक व संशोधन संस्था यासाठी स्पर्धेत होत्या. अशा परिस्थितीतही विद्यापीठाला सायबर सिक्युरिटी सेंटर केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने मंजूर केले आहे या केंद्रामध्ये २६ नोव्हेंबरपासून पहिले प्रशिक्षण सुरू होणार आहे. विद्यापीठात इनक्युबेशन आणि इनोव्हेशन सेंटरचीही स्थापना करण्यात आली आहे. जे नाविन्यपूर्ण संकल्पनांतून समाजासाठी उपयुक्त असे नवसंशोधन करण्यासाठी प्रयत्नरत असतात.'



### छत्रपती शिवरायांवरील मल्टिमीडिया संग्रह

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांवरील विविध स्वरुपातील ऑनलाइन स्रोतांचे संकलन करून त्याचे विशेष वेब-पेज विद्यापीठाच्या वेबसाइटवर केले आहे. यामध्ये १४२ इ-बुक्स व ऑडिओ बुक्स, विकिपीडिया लिंक्स, चित्रपट, पीएच.डी. शोधप्रबंधांचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
19 NOV 2018 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कॉलेजमध्ये आता 'सिलेक्शन' नाही 'इलेक्शन'

## विद्यापीठाला विद्यार्थी निवडणुकांचे परिनियम प्राप्त : २०१९ च्या निवडणुकांमध्ये विद्यार्थ्यांच्या नेतृत्व गुणास मिळणार प्रोत्साहन

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

राज्यातील उच्चशिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल करणारे 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ विधेयक' विधानसभेत दोन वर्षांपूर्वी मंजूर झाले. गतवर्षी विद्यापीठांना परिनियम प्राप्त न झाल्याने, विद्यार्थी निवडणुका मेरीटनुसारच घ्याव्या लागल्या. आता मात्र विद्यापिठांना परिनियम प्राप्त झाल्यामुळे २०१९ मध्ये विद्यार्थ्यांच्या निवडणुका लोकशाही पद्धतीने घेण्याची तयारी सरकारच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाने सुरू केली आहे.

विद्यार्थ्यांच्या निवडणुका विद्यापीठ कायदा २०१६ नुसार घेण्यासाठी गतवर्षी सर्व विद्यार्थी संघटनांनी प्रयत्न केले. पण शासनाने विद्यापीठांना परिनियम पाठवले नसल्याने या निवडणुका मेरीटनुसारच पार पडल्या. त्यामुळे सर्व राजकीय पक्षासह विद्यार्थी संघटनांनी नाराजी व्यक्त केली होती. याची दखल घेऊन शासनाने परिनियम तयार करून विद्यापीठांना



पाठवले आहेत. त्यामुळे शैक्षणिक कारकिर्दीपासूनच राजकीय करीअर करू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांचे लक्ष आता २०१९ मध्ये होणाऱ्या महाविद्यालयीत व विद्यापीठ निवडणुकांकडे लागले आहे. गेल्या दोन वर्षांपासून विद्यापीठ व महाविद्यालय पातळीवर विद्यार्थ्यांच्या निवडणुका कशा घ्यायच्या याचे परिनियम डॉ. आर. एस. माळी यांच्या अध्यक्षतेखाली बनवण्याचे काम शासन पातळीवर सुरू होते.

महाराष्ट्रात प्रथमच विद्यार्थ्यांचे नेतृत्वगुण विकसित करणारा कायदा मंजूर झाला आहे. विधीमंडळाच्या संयुक्त समितीने केलेल्या ५६ शिफारशी स्वीकारून, नवीन विद्यापीठ कायदा अंमलात आला आहे. या कायद्याअंतर्गत निवडणुकांच्या माध्यमातून विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषद किंवा इतर समित्यांवर विद्यार्थ्यांची निवड केली जाणार आहे.



नवीन विद्यापीठ कायद्यानुसार ज्या विद्यार्थ्यांना राजकारणात आवड आहे, त्या विद्यार्थ्यांना राजकीय करिअर करण्याची संधी मिळणार आहे. नवीन विद्यापीठ कायद्यामुळे सगळे अधिकार मंडळ अस्तित्वात आहेत. २०१९ पासून विद्यार्थी प्रतिनिधींना विविध अधिकार मंडळावर घेतले जाणार आहे. या कायद्यानुसार इच्छुक विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन व विद्यापीठाच्या निवडणुका लढवण्याची संधी मिळणार आहे.

पान ४ पहा

### विद्यार्थी परिनियमातील कार्यपध्दती

- महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा परिसंस्थेचा संचालक हा महाविद्यालय विद्यार्थी परिषदेच्या पहिल्या बैठकीचा अध्यक्ष असतील. महाविद्यालय विद्यार्थी परिषदेचा सचिव या बैठकीत सचिव म्हणून काम पाहील.
- विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेचा सचिव, संचालक, विद्यार्थी विकास आणि अध्यक्ष, विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद यांच्या पूर्व परवानगीने विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेची बैठकीचे नियोजन करतील.
- विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेचा सचिव, संचालक, विद्यार्थी विकास यांच्याशी विचारविनिमय करून बैठकीची कार्यसूची तयार करणे.
- विद्यापीठ विभाग विद्यार्थी प्ररिषदेचा सचिव, संचालक, विद्यार्थी विकास याच्याशी विचारविनिमय करून बैठकीची कार्यसूची तयार करील. संचालक, विद्यार्थी विकास हा विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेच्या पहिल्या बैठकीचा अध्यक्ष असेल. विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेचा सचिव या बैठकीचा सचिव असेल.
- विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचा सचिव , प्र-कुलगुरूशी विचारविनिमय करून, बैठकीची कार्यसूची तयार करेल.
- विद्यार्थ्यांच्या परिषदांची बैठक, दर तीन महिन्यांनी किमान एकदा होईल.
- विद्यार्थी परिषदेची मान्यताप्राप्त कार्यवृत्ते आवश्यक त्या कार्यवाहीसाठी प्राचार्य किंवा विद्यार्थी विकास संचालक यांच्याकडे पाठवण्यात येईल.
- वर्षाच्या अंखेरच्या बैठकीमध्ये विद्यार्थी परिषदेच्या कार्याचा अहवाल तयार करून तो प्राचार्य किंवा विद्यार्थी विकास संचालकांकडे सादर केला जाईल.

# कॉलेजमध्ये आता सिलेक्शन नाही इलेक्शन

पान १ वरून

### विद्यार्थी परिनियमातील उद्दीष्टे

विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये, मानवता आणि राष्ट्रवाद या जाणिवा बिंबवण्यास प्रोत्साहन देणे. समाजाच्या व राज्याच्या उन्नतीसाठी सौहार्दाची आणि बांधीलकीची भावना वाढीस लावणे. महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा विद्यापीठ परिसरात विद्यार्थ्यांमध्ये शिस्त लावणे व ती अबाधीत ठेवणे. विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि व्यक्तीमत्व विकासाला उत्तेजन देण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करणे. आपल्या अधिकारक्षेत्रात विद्यार्थ्यांच्या अडचणी व तक्रारींचे निवारण करण्यासाठी सक्रियपणे सहाय्य करणे. संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांना विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी नवप्रवर्तक विचार व योजना सुचवणे. समाजामध्ये विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा परिसंस्था यांच्यातील सदभावना व धारणा वाढीस लागण्यासाठी योगदान देणे. विद्यापीठ, महाविद्यालय व परिसंस्था यांच्या प्रशासनास शिस्त, सुरक्षा व विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या प्रश्नाबाबत उपाययोजना सुचवणे. वेगवेगळ्या क्रीडा, सांस्कृतिक व इतर दूरस्थ सेवादायी कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सहभागी होण्यासाठी उत्तेजण देणे.

### विद्यार्थी संघटनांमध्ये संघर्षाची शक्यता

नवीन नियमानुसार २०१९ मध्ये महाविद्यालय व विद्यापीठ निवडणुका होतील. या निवडणुकांमध्ये सर्व विद्यार्थी संघटना उतरणार आहेत. त्यामुळे विद्यार्थी संघटनांमध्ये मोठा संघर्ष होण्याची शक्यता आहे. विद्यार्थी संघटनांच्या माध्यमातून राजकीय पडसाद देखील उमटतील. पुर्वी लोकशाही पध्दतीने निवडणुका होत होत्या. या निवडणुकांमध्ये विद्यार्थ्यांची पळवा-पळवी होत होती. तसेच विद्यार्थी निवडणुकांमध्ये थेट राजकीय पक्ष उतरत होते. यातून खूनसुध्दा झाले आहेत. त्यामुळे लोकशाही पध्दतीने निवडणूक बंद करून, मेरीटनुसार निवडणूक घेण्याचा निर्णय शासनाने घेतला. मेरीटनुसार निवडणुका होत होत्या. पण यामध्ये संबंधीत विद्यार्थी प्रतिनिधीला रस असण्याचे काही कारण नसायचे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रश्न प्रलंबित होते. म्हणून पुन्हा विद्यार्थी संघटनांनी मेरीटनुसार निवडणुका बंद करून लोकशाहीनुसार घ्याव्या अशी मागणी केली होती. त्यामुळे नवीन कायद्यात तशी तरतूद करण्यात आली. शासनानेही २०१९ पासून लोकशाहीनुसार निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे २०१९ च्या विद्यार्थी निवडणुकांमध्ये एनएसयुआय, अभाविप, राष्ट्रवादी कॉंग्रेस विद्यार्थी संघटना, युवक कॉंग्रेस विद्यार्थी संघटना, युवा सेना, मनसे विद्यार्थी संघटना, अभाविप, भाजपा विद्यार्थी संघटना, एआयएसएफ, युएसए यासह अन्य संघटना आमनेसामने येणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 NOV 2018
तरुण भारत

# आलोक जत्राटकर यांच्या 'निखळ: जागर संवेदनांचा' ललित संग्रहाचे उद्या प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांच्या 'निखळ: जागर संवेदनांचा' या ललितगद्य संग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ विचारवंत प्रा. हरी नरके यांच्या हस्ते मंगळवार २० रोजी सायंकाळी ५.३० वाजता दसरा चौकातील शाहू स्मारक भवनमध्ये होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आहेत. प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के प्रमुख उपस्थित असतील.

यावेळी प्रा. नरके यांचे 'माध्यमांतील समकालीन युवालेखन आणि भारतीय मुल्यव्यवस्था' या विषयावर व्याख्यान होणार आहे. या संग्रहास शासनाच्या राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेअंतर्गत अनुदान प्राप्त झाले आहे. साहित्य रसिकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कविता सागर प्रकाशनाचे डॉ. सुनिल पाटील आणि कोल्हापूरच्या तेजस पब्लिकेशनचे रावसाहेब पुजारी यांनी केले आहे.

# ‘निखळ...’चे उद्या प्रकाशन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांच्या ‘निखळ : जागर संवेदनांचा’ या ललितगद्य संग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ विचारवंत प्रा. हरी नरके यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

मंगळवारी (ता. २०) सायंकाळी साडेपाच वाजता येथील दसरा चौकातील शाहू स्मारक भवनच्या मुख्य सभागृहात कार्यक्रम होणार आहे. यावेळी प्रा. हरी नरके यांचे ‘माध्यमांतील समकालीन युवालेखन आणि भारतीय मूल्यव्यवस्था’ या विषयावर व्याख्यान होईल.

अध्यक्षस्थान शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे भूषविणार आहेत तर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित असतील. जयसिंगपूर येथील कविता सागर प्रकाशनातर्फे प्रकाशित ‘निखळः जागर संवेदनांचा’ या ललितगद्य संग्रहामध्ये वृत्तपत्रीय स्तंभलेखन आणि ब्लॉग यामधील निवडक ३२ लेखांचा समावेश आहे. ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे यांची या संग्रहाला प्रस्तावना लाभली आहे.

लोकमत

# जत्राटकर यांच्या ललितसंग्रहाचे उद्या प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांच्या 'निखळ : जागर संवेदनांचा' या ललितगद्य संग्रहाचे प्रकाशन उद्या, मंगळवारी सायंकाळी साडेपाच वाजता राजर्षी शाहू स्मारक भवनमध्ये होणार आहे. यावेळी ज्येष्ठ विचारवंत प्रा. हरी नरके प्रमुख उपस्थित असणार आहेत.




या कार्यक्रमात प्रा. हरी नरके यांचे 'माध्यमांतील समकालीन युवालेखन आणि भारतीय मूल्यव्यवस्था' यावर विशेष व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे असतील. हा संग्रह जयसिंगपूर येथील कविता सागर प्रकाशनाने प्रकाशित केला आहे.यास राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेअंतर्गत अनुदान प्राप्त झाले आहे. वृत्तपत्रीय स्तंभलेखन आणि ब्लॉग यांमधील निवडक ३२ लेखांचा या संग्रहात समावेश असल्याची माहिती आलोक जत्राटकर यांनी दिली.

Hello Kolhapur
Page No. 3 Nov 19, 2018
Powered by: erelego.com